PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large on behalf of my **Clients, (1) Mrs. Bhanumati Jasvantray Jobalia** and **(2) Mr. Jasvantray Vrajlal Jobalia** who state that they have purchased **Flat No. – 302, Third Floor, Anand Kunj, Ghatkopar Anand Kunj C H S Ltd; Hingwala Lane, Ghatkopar – (East), Mumbai – 400077** (the Said Flat) from M/s. M. D. Enterprises vide an Agreement for Sale dated 20/07/2009**.**

The Society, **Ghatkopar Anand Kunj C H S Ltd;** has inducted my clients as Members and issued the **Share Certificate No. 19** bearing Distinctive Nos. **76** to **80 (Both Inclusive)** in their joint names (**the Said Share Certificate**).

That any Claimant / Objector / Person / Legal Heir(s) / Individual / Firm / Company having Right, Title, Interest, Benefit, Objection, Claim or Demand of any nature whatsoever in and upon the Said Flat by way of Sale, Transfer, Contract, Agreement, Mortgage, Charge, Lien, Legacy, Assignment, Trust, Easement, Exchange, Inheritance, Gift, Succession, Maintenance, Occupation, Possession or otherwise howsoever shall submit their grievance with copies of such documents and other proofs in support of their claim / objection within a period of 14 [Fourteen] days of this Notice at **Shop No. – 848, Ground Floor, Building No. – 29, Pant Nagar, Ghatkopar – (East), Mumbai – 400075** otherwise if the said grievance of obstacles or objections raised after the expiry of said period of 14 [Fourteen] days shall not be entertained.

This notice is published to retain the Title in the Said Flat and for informing that my Clients may enter into a Conveyance Deed after the expiry of the said period of 14 [Fourteen] days and the negotiations shall be completed without any reference to such claims and the claims, if any, shall be deemed to have been given up or waived and not binding on my Clients or the subsequent Purchasers.

Place: Mumbai
Date: 05-06-2025

NIMISH N. SAVLA
(Advocate, High Court, Bombay)

जाहीर नोटीस

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमचे अशील **श्रीमती जयश्री प्रविणचंद्र शाह** यांनी दुकान क्र. ३, तळ मजला, क्षेत्र २०० चौ. फूट, के. टी. नगर फेज १ को- ऑप. हौ.सो.लि., गाव मौजे नवघर, स.नं. ९, १०, ११ व १२ (पै), वसई पश्चिम, ता. वसई, जिल्हा पालघर-४०१२०२ ह्या मालमत्तेसंदर्भात करारनामा दिनांक **०५/१०/१९८३ मे. के. टी. बिल्डर्स आणि श्री. नारायण गणपतराव पाटील** दरम्यान बनलेला पहिला मूळ दस्त आणि करारनामा दिनांक **२७/०५/१९९७ श्री. नारायण गणपतराव पाटील व श्रीमती जयश्री प्रविणचंद्र शाह** दरम्यान बनलेल्या दस्ताची मूळ पावती हरवली किंवा गहाळ केले आहे. त्या संबंधात गहाळ/हरवल्याचा अहवाल नवघर पोलीस स्टेशन, वसई येथे गहाळ नोंद क्र. mpOaXEAmsS द्वारे दि. ०२/०६/२०२५ रोजी नोंदविण्यात आला आहे. जर कोणा व्यक्तीस ते सापडल्यास ते मला निम्न उल्लेखित पत्त्यावर आणून द्यावे आणि सदर मिळकतीत कोणतीही व्यक्ती/संस्था यांचा सदर मिळकत व त्याच्या कोणत्याही संदर्भात उत्तराधिकार, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाण, प्रभार, भाडेकरार, धारणाधिकार, अनुज्ञाप्ती, अभिहस्तांकन, वहिवाट, भेट, विनियम, भार, मृत्युपश्चात वारसा, वरसा, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, ताबा व अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही लाभ, हक्क, दावे व अधिकार असल्यास त्यांनी त्यासंदर्भात कागदोपत्री पुराव्यासमवेत लिखीत स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून चौदा १४ दिवसांच्या आत अशा दाव्यासंदर्भात कागदोपत्री पुराव्यासहीत आपली हरकत आमचे कार्यालय दुकान क्र. १५, के. टी. नगर फेज १ को- ऑप. हौ.सा.लि., साई नगर, लक्ष्मी मेडीकल स्टोरजवळ, वसई पश्चिम-४०१२०२ येथे सादर केली पाहीजे अन्यथा कोणाची काहीच हरकत नाही व हरकत, हक्क असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

सही/-
ॲड. गौतम वर्तक

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

जोडपत्र -IV-ए - स्थावर मिळकती/तीं चा ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) ला परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव-विक्री सूचना)

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१. फोन : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४. वेबसाईट : www.pnbhousing.com,

बोईसर शाखा: २बी, दुसरा मजला, अमेया पार्क, नवापूर रोड, बोईसर (पश्चिम), महाराष्ट्र- ४०१५०१. **विरार शाखा:** ३०२, तिसरा मजला, रिध्दी आर्केड, १०० फूट नारंगी बायपास रोड, बिग बाझार जवळ, विरार (पश्चिम), महाराष्ट्र- ४०१३०३,

सर्वसाधारण जनता आणि विशेष करून रकाना क्र. ''डी'' मध्ये दर्शवलेल्या कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यांत येते की, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/तारणी धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा आन्वयिक/प्रत्यक्ष कब्जा घेतला (रकाना क्र. सी. मध्ये वर्णन केल्याप्रमाणे) त्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेल्या रकाना क्र. डी मध्ये वर्णन केलेल्या खालील स्थावर मिळकती खालील तपशिलांनुसार **''जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जे काही आहे तेथे आहे तत्वाने''** विकल्या जाणार आहेत. आज मितीस सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ८(६) व ९ अन्वये रकाना क्र. ए मध्ये दर्शवल्याप्रमाणे जे कोणी असतील त्या संबधित कर्जदार/गहाणदार (मयत असल्यास) कर्जदार/गहाणदार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), निष्पादक, व्यवस्थापक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारे सूचना देण्यांत येते. विक्रीच्या तपशिलावर अटी आणि शर्तीसाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**/तारणी धनकोंची वेबसाईट म्हणजेच **www.pnbhousing.com** मध्ये दिलेली लिंक बघावी.

कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागितलेली रक्कम आणि तारीख (बी)	कब्जाचे स्वरूप (सी)	गहाण मिळकतीचे वर्णन (डी)	राखीव किंमत (रा. किं.) (ई)	इ. अ. र. (रा. किं. च्या १०%) (एफ)	बोली सादर करण्याची अंतिम तारीख (जी)	बोली वाढविण्याचा दर (एच)	निरीक्षणाची तारीख आणि वेळ (आय)	लिलावाची तारीख आणि वेळ (जे)	ज्ञात भार/कोर्ट केसेस असल्यास (के)
एचओयू/व्हीआरआर/१२२०/८४४८६ २ मनीष मोहनलाल कोठारी/अभिलाषा मनीष कोठारी, शा. खा. : विरार	**२९-०५-२०२४ रोजी रु.२१०२२७२.२३**	**प्रत्यक्ष कब्जा**	गोकुळ ग्रँड ३-इमारत ३,४,०, ४०३.० गोकुळ ग्रँड-इमारत- १ ते ४ माहिम, सुंदरम शाळे जवळ माहिम-पालघर रोड, पालघर पश्चिम ता. आणि जिल्हा-पालघर-४०११०४, स. क्र. ८२७/२ए प्लॉअ क्र. १ आणि स. क्र. ८२७/३ (भाग) सुंदरराम शाळे जवळ, ठाणे महाराष्ट्र-४०१४०४ भारत.	रु. १७६८०००	रु.१७६८००	०८-०७-२०२५	रु. १००००	२३-०६-२०२५ दु. १२:०० ते दु. ०४:००	०९-०७-२०२५ दु. २.०० ते दु. ३.००	माहीत नाही
एचओयू/बीओएसआर/०३२१/८७७० ५४ शिवकुमारी रामचंद्र वैश्य/धर्मादेवी रामचंद्र वैश्य शा.खा.बोईसर	**१५-०७-२०२२ रोजी रु. २४५९३५२.३९**	**प्रत्यक्ष कब्जा**	फ्लॅट क्र.३०५ ई विंग, ३रा मजला, श्रीपाल नगर ई सीएचएसएल, नवघर रोड, भाईंदर पूर्व, ठाणे, महाराष्ट्र ४०११०५, ठाणे, भारत	रु. २२५८०००	रु. २२५८००	०८-०७-२०२५	रु. १००००	२१-०६-२०२५ दु. १२:०० ते दु.०४:००	०९-०७-२०२५ दु. २.०० ते दु. ३.००	माहीत नाही

* प्रदानाच्या आणि/किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत प्रयोज्य अशा द. सा. १८% दराने पुढील व्याज, आलेले अनुषंगिक परिव्यय, खर्च, आकार इ. सह एकत्रित. ** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुती प्रमाणे रकाना क्र. 'के' मध्ये जाहीर केलेल्या व्यतिरिक्त उपरोक्त स्थावर/तारण मत्तांच्या संबंधात अन्य कोणतेही भार/दावे नाहीत. पुढे, असे भार यशस्वी खरेदीदार/बोलीदारांनी त्याच्या/तिच्या कडूनच भरावयाचे/प्रदान करावयाचे आहेत. संभाभ्य खरेदीदार/बोलीदारांनी कृपया नमूद केलेल्या भारांची सत्यता स्वतंत्रपणे पडताळून पाहावी. **१.** अजामितीस, उपरोक्त स्थावर मिळकती/तारण मत्तांना विकणे, अन्य संक्रमित करणे आणि/किंवा निकाली काढणे करता पीएनबीएचएफएल/पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी यांना मज्जाव करणारा कोणताही आदेश आणि/किंवा न्यायालयीन व्यादेश नाही **२.** संभाव्य खरेदीदार/बोलीदार आणि इच्छुक पक्षकार यांनी स्वतंत्रपणे पीएनबीएचएफएल कडे उपलब्ध असलेल्या त्या संबंधीच्या हक्काच्या दस्तावेजांच्या हक्का पुरते मर्यादित न राहता त्यासह रकाना क्र. 'के' मध्ये दिलेल्या प्रमाणे कोणत्याही पारित केलेल्या आदेश/कार्यवाहीतील युक्तीवाद इ. चे अवलोकन करावे आणि निविदा/बोली अर्ज प्रपत्र सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करुन घ्यावे. बोलीदारांना बोली फॉर्म सह या लिलावाच्या अटी आणि शर्तींवर स्वाक्षरी करावी लागेल. **३.** कृपया सूचना घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९(३) च्या अटीनुसार, बोलीदार/खरेदीदार यांनी विक्री किंमतीच्या २५% (इसारा अनामत समाविष्टीत) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी पूर्वी भरणे कायदेशीर आवश्यकता आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९(२) ला अनुसरून तारण धनकोंकडे विक्रीच्या किंमतीच्या २५% प्राप्त झाल्यानंतरच बोलीदाराच्या बाजुने विक्री निश्चित करू शकेल. विक्री मोबदल्याच्या उर्वरित ७५% खरेदीदाराने विक्री निश्चिती पत्राच्या पोचच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरेदीदारांनी देऊ केले पाहिजे आणि भरणा करण्यास कसूर केल्यास, मिळकत/तारण मत्तेची पूनर्विक्री होईल. **४. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे ई-लिलावा मार्फत विक्री आयोजित करण्यांत प्राधिकृत अधिकाऱ्यांना सहाय्य करतील ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय आहे येथे प्लॉट क्र. ६८, ३रा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरियाणा १२२००३, वेबसाईट - www.bankeauctions.com. मिळकतीचे निरीक्षण करण्याबाबत किंवा बोली दस्तावेज मिळवण्याबाबत आणि कोणताही अन्य चौकशी किंवा नोंदणीकरता कोणत्याही मदतीसाठी तुम्हाला अन्वर मुलाण आणि श्री. राजीव चंद्र, संपर्क क्रमांक १८००१२०८८०० येथे पीएनबीएचएफएल ची प्राधिकृत व्यक्ती यांचेशी समन्वय साधावा लागेल किंवा www.pnbhousing.com पहावी लागेल.**

ठिकाण : मुंबई, दिनांक : ०५.०६.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

SBI State Bank of India

स्ट्रेस्ड ॲसेटस रिकव्हरी ब्रांच, मुंबई (०५१६८):- ६वा मजला, ''दी इंटरनॅशनल'', १६, महर्षी कर्वे रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
दूरध्वनी: ०२२-२२०५३१६३/२२०५३१६४/२२०५३१६५ **ईमेल:** sbi.05168@sbi.co.in

स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत जिचा **प्रत्यक्ष कब्जा** स्टेट बँक ऑफ इंडिया, तारण धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे त्या खालील विनिर्देशानुसार संबंधित कर्जदार आणि हमीदारांकडून स्टेट बँक ऑफ इंडिया (तारण धनको) ला थकीत संबंधित रकमेच्या वसुलीसाठी **२३.०६.२०२५ रोजीस स. ११.०० ते सायं ०४.००** दरम्यान **''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्वाने विकण्यात येणार आहेत.

कर्जदाराचे नाव	वसुलीची थकबाकी देय आहे ज्याची मालमत्ता/विक्री केली जात आहे	स्थावर मिळकतींचे वर्णन	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (इएमडी) (रु. मध्ये)	मालमत्ताच्या तपासणीसाठी तारीख आणि वेळ
श्री. कुणाल के. अमले आणि सौ. सुचित्रा कुणाल अमले	रु. ५८,५३,४८४/- ०९.०९.२०२३ रोजीस त्यावरील अधिक व्याज आणि प्रभार मागणी सूचना तारीख : ०८.०९.२०२३	**मिळकत आयडी : एसबीआयएन८०८४४१५६९९५** फ्लॅट क्र. सी-३, १ला मजला वर, सी विंग, अबोली पार्क सीएसएच लि., सर्व्हे क्र.११६, हिस्सा क्र.२ए, चे गाव कोथुर्द, उत्सव मंगल कार्यालय जवळ, शिवतीर्थ नगर, पौड रोड, कोथुर्द, ता. हवेली, जिल्हा पुणे - ४११०३८ मोजमापित १०२.९४ चौ.मीटर (बिल्ट अप) तसेच ११०८.०५ चौ.फू. (३ बीएचके)	रु. १,०७,००,०००/- (रुपये एक लाख सात हजार मात्र)	रु. १०,७०,०००/- (रुपये दहा लाख सत्तर हजार मात्र)	१६.०६.२०२५ दु.२.०० ते सांय.५.००

ई-लिलाव बँकेच्या ई-लिलाव सेवा प्रदाता मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड मार्फत त्यांच्या **https://baanket.com** वेब पोर्टलवर केला जाईल. इच्छुक बोलीदारांनी याची खात्री करावी की त्यांनी स्वतः ची ई-लिलाव वेबसाइटवर नोंदणी केली आहे आणि **https://baanket.com** वर प्रदान केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सेवा प्रदात्याने तयार केलेल्या व्हर्च्युअल वॉलेटमध्ये बयाणा पैसे जमा केले आहेत.

इच्छुक बोलीदार ज्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बिड दस्तऐवज सबमिट करणे, प्रशिक्षण/प्रदर्शन, ऑनलाईन आंतर-से-बिडिंगच्या अटी व शर्ती इत्यादींसाठी सहाय्य आवश्यक आहे, त्यांनी **https://baanket.com** या वेबसाइटला भेट द्यावी.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनकोंची वेबसाईट मध्ये दिलेली लिंक बघावी **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanket.com**

सरफैसी कायद्याच्या नियम ८(६) अंतर्गत वैधानिक सूचना: सरफैसी कायदा २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत वरील कर्जाच्या कर्जदार/हमीदाराला वरील सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव ठेवण्याबाबत ही देखील एक सूचना आहे नमूद केलेली तारीख.

चौकशी: श्री. महेश चौधरी, प्राधिकृत अधिकारी, मोबाइल क्र. ७८७५०४४१९५, श्री. कस्तुरी मूर्ती, सिटी केस अधिकारी, मोबाइल क्र.९८२०५९४२३८.

दिनांक: ०५.०६.२०२५
ठिकाण: मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
स्टेट बँक ऑफ इंडिया

Bank of India
Relationship beyond banking

स्पेशलाईज्ड ॲसेटस् रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच
मेझ्झानीन फ्लोअर, ७०/८०, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
फोन क्र. : ०२२-२२६७ ३५२९, ई-मेल : SARM.MumbaiSouth@bankofindia.co.in

जंगम/स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई-लिलाव

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदी अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा कब्जा **बँक ऑफ इंडिया, एसएआरएम शाखेच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या संबंधित कर्जदारांकडून बँक ऑफ इंडियाची संबंधित थकबाकी अधिक तारखेपर्यंत व्याज आणि प्रभाराच्या वसुलीसाठी **०९.०७.२०२५** रोजी **''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे''** आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने'' विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम कोष्टकात नमूदनुसार आहे. विक्री येथे खालील पुरविलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकाराद्वारे करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्जदार/हमीदारांचे नाव आणि थकबाकी रक्कम	गहाण मिळकतींचे वर्णन	राखीव किंमत (रु. लाखात)	मिळकतीची इअर (रु. लाखात)	संपर्क क्रमांक
१.	**मे. पीआरबी ॲग्रो ॲण्ड फूड्स प्रायव्हेट लिमिटेड** भागीदार/हमीदार **श्री. राज रविंद्रकुमार भन्साली सौ. पूजा रेनिश भन्साली** थकीत रक्कम रु. ७७०.३५ लाख + व्याज + प्रभार/खर्च.	**प्लान्ट आणि मशिनरी आणि प्लॉट क्र. एल१+एल२+एल३, पीआरबी ॲग्रो ॲण्ड फूड्स प्रा. लि. येथे चिंचोळी, एमआयडीसी, चिंचोळी इंडस्ट्रीअल क्षेत्र, गाव चिंचोळीकाटी, ता. मोहोळ, जि. सोलापूर (प्रत्यक्ष ताबा)**	४५८.००	४५.८०	९८१९४०३५४९/ ०२२-२२६७३५२९
२.	**मे. एच एम मेगाब्रॅण्ड्स प्रा.लि.** भागीदार/हमीदार **श्री. अरिफ इस्माईल मर्चंट श्री. हाशिम अरिफ मर्चंट सौ. साईमा हाशिम मर्चंट** थकीत रक्कम रु. २६४.६६ लाख + व्याज + प्रभार/खर्च.	**फ्लॅट क्र. ८०२, ८ वा मजला, ए विंग, इमारत क्र. ०२, दुधवाला ॲक्का पर्ल, बेलासिस रोड, मुंबई सेन्ट्रल ४००००८. (सांकेतिक ताबा)**	२२३.००	२२.३०	९८१९४०३५४९/ ०२२-२२६७३५२९

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे:

१. विक्री **'जे आहे जेथे आहे', 'जे आहे जसे आहे, आणि 'जे काही आहे तेथे आहे तत्त्वाने'** करण्यात येईल आणि तो ''ऑनलाईन'' करण्यात येईल.
२. बोलीदारांना ई-लिलावामध्ये नोंदणी करणे आणि भाग घेण्यासाठी **पीएसबी अलायंस (https://baanknet.com)** ला भेट द्यावा लागेल, इएमडी (इसारा अनामत रक्कम) च्या प्राप्तीसाठी कट ऑफ तारीख आणि वेळ **०९.०७.२०२५** रोजीस **दु. ४.०० वा.** पर्यंत असेल. बोलीदारांना फक्त दिलेल्या वेळेच्या मर्यादेत सर्व नोंदणी आणि ईएमडी संबंधित औपचारिकता पूर्ण करण्यास विनंती आहे.
३. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार मिळकत/तींवर तेथे बोजा नाही. तथापि इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मिळकत/तींचे नामाधिकार, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात ही काही घटक नाही आणि बँकेचे सादरीकरण किंवा वचन मानण्यात येऊ नये. मिळकत बँकेला ज्ञात किंवा अज्ञात विद्यमान आणि भविष्यातील बोजासह विकण्यात येईल. **प्राधिकृत अधिकारी/तारण धनको** कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही. विक्रीसाठी ठेवलेल्या मिळकत/तींच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.
४. **अनु क्र. १ व २ येथे सूचिबद्ध मिळकतीकरीता ऑनलाईन ई लिलावाची तारीख ०९.०७.२०२५ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० दरम्यान असेल.**
५. निरीक्षणाची तारीख ही अनु क्र. १ येथे सूचिबद्ध मिळकतीकरीता **२३.०६.२०२५** रोजीस **दु. ०२.०० ते दु. ०४.०० दरम्यान** राहील आणि अनु. क्र. २ करिता **२४.०६.२०२५** रोजीस **दु. ०२.०० ते दु. ०४.००** दरम्यान राहील.
६. इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येते त्यांनी निरिक्षणाच्या उत्तम सुविधेकरीता मिळकतीचे निरिक्षण ईमेल **sarm.mumbaisouth@bankofindia.co.in** आणि/किंवा वरील उल्लेखित संपर्क क्रमांक आणि/किंवा बँक ऑफ इंडिया, एसएआरएम शाखा, संपर्क क्र. (०२२) २२६७३५२९/२२६७३५४९ द्वारे सूचना नंतरच करावे.
७. फक्त ऑनलाईन प्रक्रियेद्वारे बोली सादर करणे आवश्यक आहे.
८. बोली मूल्य आरक्षित मूल्यापेक्षा जास्त असावी आणि बोलीदार त्यांचे पुढील प्रस्ताव **अनु क्र. १ व २** येथे सूचिबद्ध मिळकतीकरीता **रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) च्या पटीत** वाढवू शकतात.
९. बोलीदारांना ई-लिलाव विक्री प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी आणि त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता वेबसाईट बघण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
१०. बोलीदारांनी विक्रीच्या अटी आणि शर्ती वाचल्याचे आणि समजून घेतल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्यावर बंधनकारक राहतील.
११. बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीबाबत त्यांचे समाधान आणि निरीक्षण करणे ही इच्छुक बोलीदाराची जबाबदारी राहील.
१२. यशस्वी बोलीदाराची इसारा अनामत रक्कम (इअर) विक्री मोबदल्याचा भाग म्हणून राखून ठेवण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची इअर परत करण्यात येईल.
१३. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही. यशस्वी बोलीदाराने प्राधिकृत अधिकाऱ्यांनी बोली किंमत स्वीकारल्यानंतर त्वरित अगोदर जमा केलेल्या इअरसह विक्री किंमतीच्या २५% आणि विक्री किंमतीची उर्वरित शिल्लक विक्रीपासून १५ दिवसात वा पूर्वी जमा करणे आवश्यक आहे. लिलाव बँकेच्या निश्चितीअधीन राहील. यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास अगोदर जमा केलेले सर्व पैसे जप्त करण्यात येतील आणि मिळकत पुन्हा लिलावासाठी ठेवण्यात येईल आणि कसूरवार बोलीदाराचा मिळकत/रकमेच्या संदर्भात दावा/हक्क राहणार नाही.
१४. **प्राधिकृत अधिकारी**/बँक किंवा ई-लिलाव सेवा पुरवठादार हे इंटरनेट प्रॉब्लेम/वीज जाणे किंवा कोणत्याही तांत्रिक अडचणी इ. करिता जबाबदार राहणार नाहीत. अशा आकस्मिक घटना टाळण्यासाठी बोलीदारांना ई-लिलाव प्रक्रियेत यशस्वीरित्या सहभागी होण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य उपकरणे, पॉवर बॅकअपची खात्री करण्याची विनंती करण्यात येत आहे.
१५. खरेदीदाराने प्रयोज्य मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क/इतर प्रभार इ. आणि सांविधिक/विना-सांविधिक थकबाकी, कर, अभिहस्तांकन प्रभार इ. कोणाचीही देणी भरायची आहेत.
१६. उच्चतम प्रस्ताव स्वीकारणे **प्राधिकृत अधिकारी**/बँकेवर बंधनकारक नाही आणि त्यांना कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी ई-लिलाव तहकूब/पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मिळकत किंवा तिचा भाग काढून घेण्याचे सर्वस्वी हक्क आणि स्वेच्छा निर्णय राहतील.
१७. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदार/उच्चतम बोलीदाराच्या नावे जारी करण्यात येईल आणि कोणत्याही अन्य नावाने जारी करण्यात येणार नाही.
१८. विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत विहित नियम/अटीच्या अधीन राहील. विक्रीच्या अटी आणि शर्तीवर पुढील चौकशी/तपशील काही असल्यास संबंधित शाखेच्या संपर्क क्रमांकावरून प्राप्त करता येईल.

कर्जदार/हमीदारांसाठी विक्री सूचना

निम्नस्वाक्षरीकार **बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी** असल्याने, ही विक्री सूचना जारी करण्याचे व सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम हयांच्या अन्वये विक्रीचे सर्व अधिकार वापरण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. वर वर्णन केलेल्या बँकेने मंजूर केलेल्या अग्रिमां संबंधात मासिक आधाराने व्याज, खर्च व आकार इ. सह थकीत रकमेचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केली आहे. म्हणून ६० दिवसांत उपरोक्त रक्कम अदा करण्यासाठी कलम १३(२) अन्वये बँकेने तुम्हा सर्वांना एक मागणी **सूचना जारी केली. ६० दिवस संपूनही तुम्ही** रकमेचे प्रदान केलेले नाही म्हणून, **प्राधिकृत अधिकाऱ्यांनी** कलम १३(४) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वरील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेल्या तारण मत्तांचा सांकेतिक कब्जा घेतला. तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येते की, विक्रीच्या निर्धारित तारखेपूर्वी वरील रक्कम तुम्ही प्रदान करावी. कसूर केल्यास, मिळकतीची विक्री केली जाईल आणि शिल्लक थकबाकी काही राहिल्यास व्याज व खर्चासह तुमच्याकडून वसूल केली जाईल. कृपया ध्यानात ठेवावे की, मागणी सूचना, कब्जा घेणे, मूल्यांकन आणि मत्तांची विक्री इ. शी संबंधित सर्व खर्च, पहिल्यांदा निम्नस्वाक्षरीकारांद्वारे वसूल केल्या जाणाऱ्या विक्री उत्पन्नातून वजा केला जाईल आणि विक्री किंमतीपैकी उर्वरित रक्कम तुमच्या वरील दायित्वात वर्ग केली जाईल. इसारा रक्कम जमा करण्यासहित त्याच्या अटी आणि शर्तीवर होणाऱ्या लिलावात सहभागी होण्याची मोकळीक तुम्हाला आहे.

दिनांक : ०४.०६.२०२५
ठिकाण : मुंबई

सही/-
बँक ऑफ इंडिया
प्राधिकृत अधिकारी,

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे कळविण्यात येते की श्री अनिल अंबुमल बुधरानी यांना ऑफिस ब्लॉक क्र. ३४६, सेंट्रल फॅसिलिटी बिल्डिंग - १, ए.पी.एम.सी. मार्केट - १, सेक्टर १९, तुर्भे, नवी मुंबई ४००७०५ येथील स्थावर मालमत्तेबाबत कायदेशीर हक्क, नामाधिकार व हितसंबंध आहेत. वरील श्री अनिल अंबुमल बुधरानी यांनी हे कार्यालय मे. हाजी रझाक ॲण्ड कंपनी यांच्याकडून खरेदी केले असून, त्यांनी सदर ऑफिस ब्लॉक क्र. ३४६ आपले नाव नोंदविण्याकरिता कृषी उत्पन्न बाजार समितीकडे अर्ज केला आहे.

कोणत्याही व्यक्तीस जर वरील मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, अदलाबदल, वारसा, करार, कंत्राट, गहाण, सुविधाधिकार, भेट, भाडेपट्टा, कुळवहिवाट, धारणाधिकार, प्रभार, ट्रस्ट, वास्तव्यासाठीचा हक्क, देखभाल अथवा हरवलेले दस्तऐवज किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दावा अथवा आक्षेप असल्यास, त्यांनी संबंधित दाव्याचे दस्तऐवजांसह लेखी स्वरूपात कृषी उत्पन्न बाजार समिती, मुख्य प्रशासन कार्यालय, सेक्टर १८, वाशी, नवी मुंबई ४००७०३ या पत्त्यावर या सूचनेच्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सादर करावे. कसूर केल्यास, असे मानण्यात येईल की, अशा दावे आणि/किंवा आक्षेप काही असल्यास, ते त्यागलेले आणि/किंवा परित्याग केलेले आहेत, आणि कृषी उत्पन्न बाजार समिती वरील ऑफिस ब्लॉकचे हस्तांतरण श्री अनिल अंबुमल बुधरानी यांच्या नावावर करील.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : ०५.०६.२०२५

कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत
मानद सचिव

पंजाब एण्ड सिंध बैंक (भारत सरकार का उपक्रम) **Punjab & Sind Bank** (A Govt. of India Undertaking)
Where service is a way of life

मुख्यालय, विधी आणि वसुली विभाग, ईमेल: ho.lr@psb.co.in

डब्ल्यूडी: आयसी: ०९: २०२५-२६ **दिनांक : ०५.०५.२०२५**

(बाधा येऊ न देता)

श्री. मनोज जैसवाल,
पुर्ण वेळ संचालक (मे. कॉर्पोरेट इस्पात अलॉईज लिमिटेड), शिवलोक, ८१०, बी-विंग, जे. पी. हाईटस्, आरबीआय कॉलनी जवळ, गोंडवना चौक, बायरामजी टाऊन, जरिपटका, नागपूर- ४४००१४.

श्री. रविंद जैसवाल,
पुर्ण वेळ संचालक (मे. कॉर्पोरेट इस्पात अलॉईज लिमिटेड), ४, मानिकतल्ला बाजार लेन, पीओ-बीडोन स्ट्रीट, कोलकाता-७००००६.

हेतूपुरस्सर कसूरवारीकरिता आयडेन्टिफिकेशन कमिटीद्वारे मंजुर केलेला आदेश

हेतूपुरस्सर कसूरवार म्हणून मे. कॉर्पोरेट इस्पात अलॉईज लिमिटेडचे श्री. मनोज जैसवाल आणि श्री. रविंद्र जैसवाल, पुर्ण वेळ संचालक यांना घोषित करण्याच्या प्रकरणात

आदेश

आरबीआय मार्गदर्शन तत्त्वे आणि बँकेच्या व्याख्येनुसार दिनांक ०८.०५.२०२४ रोजीची कारणे दाखवा सूचना ही श्री. मनोज जैसवाल आणि श्री. रविंद्र जैसवाल-मे. कॉर्पोरेट इस्पात अलॉईज लिमिटेडचे पूर्ण वेळ संचालक यांना बजावण्यात आली होती आणि संधी देण्यात आली होती.

प्रकरणाच्या खालील सत्य परिस्थितीची काळजीपुर्वक तपासणी केल्यानंतर आयडेन्टिफिकेशन कमिटीने खालीलप्रमाणे आदेश मंजुर केला:

कारणासहित आदेश :

रिझर्व्ह मार्गदर्शक तत्त्वांनुसार ट्रिगर पॉईंटस्	**बँकेकडे उपलब्ध दस्तावेजांनुसार पार्श्वभूमी**
निधींचा अपहार : **ए)** युनिटने धनकोंना प्रदान/परतफेडीचे दायित्व पूर्ण करण्यात कसूर केली आणि निधींचा अपहार केला आहे की वित्त पुरवठा ज्या विशिष्ट हेतूसाठी घेतला होता त्यासाठी वापरण्यात आलेला नाही किंवा निधी इतर मालमत्तेच्या स्वरूपात युनिटकडे उपलब्ध नाही. **बी)** कर्ज निधी उपकंपन्या / समूह कंपन्या किंवा अन्य कॉर्पोरेट संस्थांकडे कोणत्याही प्रकारे हस्तांतर केला.	मे. टी. आर. चड्ढा ॲण्ड कंपनी एलएलपी, फॉरेन्सिक ऑडिटर द्वारे सादर केलेल्या फेब्रुवारी, २०१० ते मार्च, २०१५ कालावधीकरिता दिनांक ३०.०५.२०१८ रोजीच्या फॉरेन्सिक ऑडिट अहवालानुसार खालील बाबी निरीक्षणात आल्या आहेत: **ए)** ॲक्सिस बँकेमार्फत मे. बाहुबली प्रॉपर्टीज लिमिटेड यांना भारु. १०८.६९ कोटी रुपये अदा करण्यात आले. त्याच बँक खात्यातून त्यांच्याकडून भारु. ६३.३४ कोटी रुपये परत प्राप्त झाले. एकूण स्वरूपात, भारु. ४५.३५ कोटी रुपये (निव्वळ) मे. बाहुबली प्रॉपर्टीज लिमिटेड यांना अदा करण्यात आले. तथापि, असे नमुद करण्यात आले की, बाहुबली प्रॉपर्टीज लिमिटेडच्या आर्थिक वर्ष २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ च्या आर्थिक विवरणपत्रानुसार त्यांची संपूर्ण उलाढाल प्रामुख्याने शेअर्स खरेदी-विक्री व व्याज उत्पन्नावर आधारित होता. त्यामुळे अशा कंपनीकडून मे. कॉर्पोरेट इस्पात अलॉईज लिमिटेड सारख्या कंपनीस कोणताही ॲडव्हान्स देण्याचा व्यवसाय नव्हता. **बी)** कर्जदार कंपनीने मे. अभिजीत प्रोजेक्ट्स लिमिटेड यांची कोळसा हाताळणी प्रकल्प, कोळसा वॉशरी व इतर पायाभूत सुविधा/ नागरी कामांसाठी ईपीसी कंत्राटदार म्हणून नियुक्ती केली होती. मे. अभिजीत प्रोजेक्ट्स लिमिटेड या (ईपीसी कंत्राटदार) दोन पूर्ण मालकीच्या उपकंपन्या होत्या-मे.अभिजीत एंटरप्रायझेस लिमिटेड व मे. अभिजीत लॉजिस्टिक्स लिमिटेड, हाँगकाँग. कंपनीने मे. अभिजीत एंटरप्रायझेस लिमिटेडमध्ये पूर्णपणे कन्व्हर्ट होणाऱ्या डिबेंचर्सच्या स्वरूपात भारु. ३८६२.४० कोटी रुपये गुंतवले होते. मे. अभिजीत एंटरप्रायझेस लिमिटेडच्या लेखापरिक्षित आर्थिक विवरणानुसार, मोठ्या प्रमाणावर रक्कम ५०० पेक्षा अधिक कंपन्यांमध्ये गुंतविण्यात आली होती. यामध्ये अशा कंपन्यांचा समावेश आहे ज्यांनी अभिजीत व्हेंचर्स लिमिटेडमध्ये गुंतवणूक केली होती, आणि अभिजीत व्हेंचर्स लिमिटेडने मे. कॉर्पोरेट इस्पात ॲलॉइज लिमिटेडमध्ये गुंतवणूक केली होती. त्यामुळे, मे. अभिजीत प्रोजेक्ट्स लिमिटेड यांना विविध समूह कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या ॲडव्हान्सेस मे. अभिजीत एंटरप्रायझेस लिमिटेडमार्फत ५०० हून अधिक कंपन्यांमध्ये गुंतवून पुन्हा विविध समूह कंपन्यांमध्ये गुंतवले गेले, ज्यामध्ये मे. कॉर्पोरेट इस्पात ॲलॉइस लिमिटेडचाही समावेश आहे. हे निधींचे साखळीव्दारे पुनरावर्तन असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी मे. कॉर्पोरेट इस्पात ॲलॉइस लिमिटेडच्या आर्थिक विवरणात भारु. १०४.४३ कोटी रुपये मे. अभिजीत प्रोजेक्ट्स लिमिटेडकडे भांडवली ॲडव्हान्स म्हणून देय असल्याचे दिसते. परिणामी, असे आढळते की कर्जदात्यांकडून प्राप्त कर्जराशी मे. अभिजीत प्रोजेक्ट्स लिमिटेडमार्फत विविध संस्थांमध्ये वळविण्यात आल्या, आणि नंतर मे. अभिजीत प्रोजेक्ट्स लिमिटेड या कंपनीवर दिवाळखोरी कार्यवाही (श्रळींळवरींळेप) लागू करण्यात आली.
सी) धनकोंच्या सहमती शिवाय पूर्वपरवानगी इक्विटी /डेब्ट इंस्ट्रुमेंट्सद्वारे गुंतवणूक इतर कंपन्यांमध्ये गुंतवणुक केली.	**सी)** मे. कॉर्पोरेट इस्पात ॲलॉइस लिमिटेड यांनी मे. कॉर्पोरेट पॉवर लिमिटेडमध्ये भारु.१,१२६.०४ कोटी रुपये गुंतवले होते. तथापि, सर्व कन्सोर्टियम कर्जदात्यांकडून निर्गमित करण्यात आलेल्या मंजुरी पत्रांमध्ये स्पष्ट नमूद आहे की, सुविधा कालावधीत कर्जदाराने कर्जदात्यांची लेखी पूर्वपरवानगी न घेता कोणत्याही इतर संस्थेमध्ये शेअर भांडवल स्वरूपात गुंतवणूक करू नये, निधी ॲडव्हान्स करू नये किंवा ठेव ठेऊ नये, केवळ नेहमीच्या व्यवसायापुरते अपवाद वगळता. यावरून असे दिसते की, कन्सोर्टियम कर्जदात्यांच्या मंजुरी पत्राच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करण्यात आले आहे, व निधी मंजूर उद्देशाव्यतिरिक्त वळवण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ मध्ये मे. कॉर्पोरेट पॉवर लिमिटेडमध्ये गुंतवलेली संपूर्ण रक्कम आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये मे. कॉर्पोरेट इस्पात ॲलॉइस लिमिटेड यांनी अप्रभावी म्हणून दाखवली असून त्यातून तोटा झाला आहे.

वरील सत्यपरिस्थिती आणि रितसर विचारविनियम केल्यानंतर ईडी द्वारे मुख्य असलेल्या हेतूपुरस्सर कसूरवारीकरिता आयडेन्टिफिकेशन कमिटीने आरबीआय मार्गदर्शक तत्त्वे आणि बँकेच्या धोरणांनुसार ०२.०४.२०२५ रोजी हेतूपुरस्सर कसूरवार म्हणून श्री. मनोज जैसवाल आणि श्री. रविंद्र जैसवाल-मे. कॉर्पोरेट इस्पात अलॉईज लिमिटेडचे पूर्ण वेळ संचालक यांना ठरविले.

तुम्ही ''हेतूपुरस्सर कसूरवार'' म्हणुन तुम्हाला का वर्गीकृत करु नये यासाठी ''हेतूपुरस्सर कसूरवारांकरिता पुर्नविलोकन कमिटी, एचओ एल ॲण्ड आर डिपार्टमेंट, पंजाब ॲण्ड सिंध बँक, १ला मजला, प्लेट बी, ब्लॉक ३, एनबीसीसी टॉवर्स, इस्ट किडवाई नगर, दिल्ली-११००२३'' यांचेकडे हेतूपुरस्सर कसूरवाराच्या पुर्नविलोकन कमिटीकडे लेखी अभिवेदन करु शकता. तुमचे अभिवेदन सदर प्राप्ती पासून २१ दिवसात आमच्याकडे पोहोचणे आवश्यक आहे. जर तुम्ही कोणतेही अभिवेदन केले नाही तर प्रकरणाचा पुढील कोणतीही संधी न देता निर्णय करण्यात येईल.

(हेतूपुरस्सर कसूरवारीवरील आयडेन्टिफिकेशन कमिटीसाठी निमंत्रक)

SBI State Bank of India

प्राधिकृत अधिकाऱ्यांचे तपशील :	**स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट शाखा - I**
नाव : दिनेश कुमार नगर	**शाखेचा पत्ता:** दी आर्केड,
ई-मेल आयडी : team3.04107@sbi.co.in	२ रा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,
मोबाईल क्र : ८९६६००९१२७	कुलाबा, मुंबई-४०० ००५
लँण्डलाईन क्र. (ऑफिस): ०२२-२२१७७६६७.	**शाखेचे ई-मेल आयडी :** sbi.04107@sbi.co.in

ई-लिलाव विक्री सूचना — जोडपत्र- ए

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये बँकेकडे भारग्रस्त स्थावर मालमत्तेची (फ्लॅट) विक्री.
तसेच सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८(६) अन्वये सूचना

स्टेट बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, बँक ऑफ बडोदा, आयडीबीआय बँक, पीएनबी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक यांचा समावेश असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया कन्सोर्टियमचे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी करणारे यांनी कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत खालील मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

जनतेला कळविण्यात येते की, बँकेच्या थकबाकी वसूल करण्यासाठी खालील प्रकरणांमध्ये जमीन आणि इमारत (फ्लॅट) समाविष्ट असलेल्या आकारलेल्या मालमत्तेचा ई-लिलाव (कायदा, २००२ अंतर्गत) ''जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते'' या तत्त्वावर केला जाईल.

कर्जदारांचे नाव: मे. टॉपवर्थ स्टील ॲण्ड पॉवर प्रा. लि.,
(नोंदणीकृत पत्ता)- २०६, रहेजा सेंटर, २१४, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट मुंबई महाराष्ट्र भारत ४०००२१

हमीदार(रां)चे नाव वैयक्तिक आणि कॉर्पोरेट हमीदार:- १.श्री. नितीन गोलेचा, २.सौ. शर्मिष्ठा सुरेंद्र लोढा; ३.श्री. अभय एन.लोढा; ४.श्री. अश्विन एन. लोढा, ५.श्री. सुरेंद्र चंपालाल लोढा; ६. मे. अक्षता रिअल्टर्स प्रा. लि.; ७. मे. भिलाई सिमेंट कंपनी प्रा. लि.; आणि ८. मे. टॉपवर्थ एनर्जी प्रा. लि

जिच्या वसुलीकरिता मिळकती विकल्या गेल्या आहेत ती थकबाकी रक्कम :

बँकेचे नाव	३०.०४.२०२० रोजीस थकीत रक्कम
स्टेट बँक ऑफ इंडिया	रु. ९५३,८७,६१,११७.२४
युनियन बँक ऑफ इंडिया	रु.२३०,०३,९०,५१२.००
इंडियन बँक	रु. ६५,३९,३२,४०२.००
ई-देना बँक आता बँक ऑफ बडोदा	रु. २१९,७०,३०,५५८.०८
आयडीआयबी बँक	रु. १५०,६८,३८,६३२.७१
ई-ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आता पंजाब नॅशनल बँक	रु. ३४९,०२,४६,७८०.६२
सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया	रु. २०६,०१,३६,६४७.९९
पंजाब नॅशनल बँक	रु. १८४,३१,५६,१४०.००
कॅनरा बँक	रु. ४६,४२,०७,६८९.२०
कॉर्पोरेशन बँक	रु. १३०,२८,८४,६४०.००
ई-कॉर्पोरेशन बँक आता युनियन बँक ऑफ इंडिया	रु. १३०,२८,८४,६४०/-
ई-अलाहाबाद बँक आता इंडियन बँक	रु. २३९,३२,७०,६६२.३९
एकूण रु.	रु. २७७५०८५५७८२.२३

३०.०४.२०२० रोजीस + तारखेपर्यंत त्यावरील सांपार्श्विक दराने व्याज + खर्च आणि परिव्यय (वजा वसुली) **मे. टॉपवर्थ स्टील ॲण्ड पॉवर प्रा. लि.** कडून तारण धनको

मालक/नामाधिकार विलेखधारकाचे नाव: मे. अक्षता रिअल्टर्स प्रा. लि.

मिळकतीचे वर्णन: (१) महानगरपालिका 'एच' वॉर्ड अंतर्गत मूल्यांकन आणि मुंबई उपनगरातील नोंदणी जिल्ह्यात आणि नोंदणीकृत उपजिल्हा बांद्रा मध्ये १४वा रोड, खार (पश्चिम), मुंबई येथे स्थित असलेले आणि वसलेले जमीन मोजमापित अंदाजे ६९० चौरस यार्ड धारक प्लॉट क्र. ३९४-ए, सिटी सर्वे क्रमांक ई/२६८ च्या भाग आणि विभागाव बांधलेले ''शिवराज हाइट्स'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर निवासी फ्लॅट क्र. ४०१, मोजमापित अंदाजे ११९३.५० चौरस फूट म्हणजेच ११०.९२ चौरस मीटर बिल्ट अप क्षेत्र म्हणजेच समतुल्य ९९४.६० चौरस फूट म्हणजेच ९२.४५ चौरस मीटर चटई क्षेत्र.

राखीव किंमत (रा.कि.) : रु. ५,०५,००,०००.००

इसारा अनामत रक्कम (इअर) : रु. ५०,५०,०००.००

च्या पटीत बोली वाढविण्याची रक्कम : बोली वाढविण्याची रक्कम रु. ५०,०००/-

निरीक्षणाची तारीख आणि वेळ : हे स्पष्ट करण्यात येते की फ्लॅट बँकेच्या नावे आकारला जात असला तरी, बँकेकडे सदर फ्लॅटच्या प्रत्यक्ष ताबा नाही. त्यानुसार, बँकेला कोणताही आधार किंवा दायित्व न देता, संभाव्य बोलीदारांना त्यांच्या योग्य तपासणीत शक्य तितकी मदत करण्यास बँक तयार आहे. ती कोणत्याही तपासणीची व्यवस्था करण्याची जबाबदारी घेत नाही. संभाव्य बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी स्वतंत्रपणे फ्लॅटशी संबंधित मालकी हक्क आणि तपशीलांची शुद्धता तपासू शकतात आणि प्रश्नातील फ्लॅटचा आकार/क्षेत्रफळ आणि प्रश्नातील फ्लॅटच्या संदर्भात इतर कोणतेही देयके/दायित्वे/भार आणि फ्लॅटच्या संदर्भात इतर कोणतेही देयके/दायित्वे/भार यासह स्वतःचे समाधान करू शकतात.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ : ई-लिलाव ०९.०७.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ०२.००

सहभागी होण्यासाठी विनंतीपत्र / केवायसी दस्तावेज/ इअरचा पुरावा इ. सादरीकरण करीता: ई-लिलाव साईट वर ऑनलाईन सादरीकरण https://ebkray.in

ई-लिलाव **''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे तत्त्वाने'', ''जे काही आहे तेथे आहे तत्त्वाने''** आणि **''जे कोणत्याही आधाराशिवाय''** करण्यात येईल आणि तो ''ऑनलाईन'' करण्यात येईल. पीएसबी अलायन्स वेबपोर्टल **(https://ebkray.in)** मार्फत करण्यात येईल.

प्राधिकृत अधिकारी, श्री. दिनेश कुमार नागर, मोबाईल क्र. ८९६६००९१२७.

ऑनलाईन ई-लिलाव बोली प्रपत्र, घोषणा, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती समाविष्ट ई-लिलाव निविदा दस्तावेज वेबसाईटः **(https://ebkray.in)** वर उपलब्ध आहेत.

प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे मिळकती/तींवर कोणतेही भार नाहीत. तथापि, काही प्रलंबित देणी/शुल्क/कर असू शकतात जे यशस्वी बोलीदाराने मूल्यांकन/भरावे लागतील. इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे मालकी हक्क आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देयके याबद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात बँकेचे कोणतेही वचनबद्धता किंवा कोणतेही प्रतिनिधित्व दर्शवत नाही आणि ती मानली जाणार नाही. ही मालमत्ता बँकेला ज्ञात असो वा नसो, विद्यमान आणि भविष्यातील सर्व भारांसह विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय-पक्षाच्या दाव्यांसाठी/हक्क/देयकेसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतात. विक्री सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विहित केलेल्या नियम/शर्तीच्या अधीन असेल. ई-लिलावाच्या इतर अटी आणि शर्ती खालील वेबसाइट्सवर प्रकाशित केल्या आहेत. १. **https://ebkray.in** २. **https://www.sbi.co.in**

दिनांक : ०३.०६.२०२५
ठिकाण : मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया

जाहिर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार आम्ही याखाली नमुद करण्यात आलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जमिनीतील **(“जमीन”)** अविभाजित मालकी हक्कासंदर्भात मुंबईतील प्रौढ, ख्रिश्चन भारतीय रहिवासी **श्री केनेथ ॲलेक्स मिरांडा** यांच्या अधिकाराची, मालकी हक्काची आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत.

मिरांडा कुटुंबातील इतर सदस्यांसह श्री केनेथ ॲलेक्स मिरांडा हे जमिनीचे मूळ मालक असलेले पुर्वीचे मालक श्री मतेश ऊर्फ मॅथ्यू ऊर्फ मतेस संजव मिरांडा आणि श्रीमती नॅटिल मार्टिन मतेश मिरांडा (पती आणि पत्नी) यांचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी असल्याचा दावा करीत आहे.

सर्व व्यक्तींचे श्री केनेथ ॲलेक्स मिरांडा यांचे जमिनीतील अविभाजित अधिकार/मालकी हक्क/हिंतसंबंधा विरोधात/वर/संदर्भात वारसा, गहाणवट, मालकी हक्काच्या कागदपत्रांच्या ठेवीद्वारे गहाणवट, ऋणभार, विक्री, विक्रीसाठी करार, हस्तांतरण, नियुक्ती, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, परवाना, उप-परवाना, धारणाधिकार, भार, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, भेट, प्रलंबित दावे, विनिमय, हिस्सा, लाभार्थी, ताबा, मुक्तता, त्याग, विभाजन, कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, वसिहत, चटई क्षेत्राचे निर्देशाक, कुळ, विकसन अधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, वितरण, कोणत्याही न्यायालयाचा, वैधानिक किंवा निर्णय देणा—या प्राधिकरणाचा आदेश किंवा डिक्री किंवा इतर कोणत्याही पद्धतीने किंवा अन्यथा कोणताही दावा आणि/किंवा मागणी आणि/किंवा आक्षेप **(“दावे”)** असल्यास त्यांनी याद्वारे खैतान ॲण्ड कंपनी, वकिल यांना वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर-१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. देवेंद्र देशमुख यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत आवश्यक सहाय्यक कागदपत्रांच्या प्रतीसमवेत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, असे मानले जाईल की असे कोणतेही दावे, अधिकार, मालकी हक्क, इस्टेट किंवा हितसंबंध अस्तित्वात नाहीत आणि ते माफ केले आहेत आणि/किंवा सोडुन दिले आहेत आणि/किंवा ते श्री केनेथ ॲलेक्स मिरांडा आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही आणि असे समजले जाईल की उपरोक्त श्री केनेथ ॲलेक्स मिरांडा यांचे हक्क वैध आणि विद्यमान, स्पष्ट, विक्रीयोग्य आणि अश्या दाव्यांचा संदर्भ न घेता भारमुक्त आहेत.

अनुसूची
(जमिनीचे वर्णन)

मुंबई उपनगरच्या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्हयातील अंधेरीच्या शहर सर्वेक्षण कार्यालयाच्या स्थानिक हद्दीमधील तालुका अंधेरी, वर्सोवा गावातील सीटीएस क्रमांक ११२४/ए असलेला मोजमापीत ४,५२२.२० चौरस मिटर्स जमिनीच्या तुकडयातील आणि खंडातील अविभाजीत हिस्सा. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

पुर्वेकडे वा त्या दिशेला	: सीटीएस क्रमांक ११२४/बी
पश्चिमेकडे वा त्या दिशेला	: विद्यमान रस्ता आणि सीटीएस क्रमांक ११२३
उत्तरेकडे वा त्या दिशेला	: विद्यमान रस्ता आणि सीटीएस क्रमांक ११२३
दक्षिणेकडे वा त्या दिशेला	: सीटीएस क्रमांक ११२८

आज दिनांक ५ जुन २०२५

खैतान ॲन्ड कंपनी करीता
सही /-
देवेंद्र देशमुख
भागीदार

जाहीर सूचना

मुंबई शहराच्या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्हा सीमेमध्ये, “खुदाबक्ष बिल्डिंग” म्हणून ज्ञात, सरदार बळवंत सिंग दोधी मार्ग कोपऱ्यावर आणि माझगाव रोड, माझगाव (टी. टी.), मुंबई - 400 010 येथे स्थित, वार्ड क्र. ई - 4817 (2-3) आणि ई - 4817 (2 अ -3 अ) धारक, माझगाव डिव्हिजनच्या सी. एस. क्र 3A / 124, धारक मालमत्तेच्या डी. सी. रेग्युलेशन 33 (7) अंतर्गत प्रस्तावित पुर्नविकास धारक संरचना. मालमत्तेचे मालक श्री. महेंद्र रावजी छेडा, श्री. केकीन कुंवरजी छेडा, श्री. रसिक कुंवरजी छेडा, श्री. रमेश रावजी छेडा आहेत. मालक स्वत:च मालमत्तेचा विकास करित आहेत. उपरोक्त संदर्भाच्या संरचनेच्या भाडेकरू / भोगवटादारांची यादी खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	सदस्याचे नाव	भोगवटादाराचे नाव	मजला	खोली/ दुकान क्र.	उपभोक्ता
1			तळ	1 आणि 2	अनिवासी
2	श्री. खालील एहम्मद हम्दउल्हे आणि श्री. फैसल खालील हम्दउल्हे	श्री. खालील एहम्मद हम्दउल्हे आणि श्री. फैसल खालील हम्दउल्हे	तळ	4 आणि 5	अनिवासी
3	श्री. रुबीन केकीन छेडा	श्री. रुबीन केकीन छेडा	तळ	6आणि (पार्ट3)	अनिवासी
4	श्री. रुबीन केकीन छेडा	श्री. रुबीन केकीन छेडा	तळ	7	अनिवासी
5	श्रीमती सोनल रसिक छेडा	श्रीमती सोनल रसिक छेडा	तळ	1	निवासी
6	श्रीमती सोनल रसिक छेडा	श्रीमती सोनल रसिक छेडा	तळ	2	निवासी
7	श्रीमती सोनल रसिक छेडा	श्रीमती सोनल रसिक छेडा	तळ	3	निवासी
8	श्री. बेंजामिन ग्रेगरी डिसोजा	श्री. बेंजामिन ग्रेगरी डिसोजा	तळ	3 (अ)	निवासी
9	श्रीमती माधवी रुबीन छेडा	श्रीमती माधवी रुबीन छेडा	पहिला	4	निवासी
10	श्रीमती माधवी रुबीन छेडा	श्रीमती माधवी रुबीन छेडा	पहिला	5	निवासी
11	श्रीमती माधवी रुबीन छेडा	श्रीमती माधवी रुबीन छेडा	पहिला	6	निवासी
12	श्री. सुकेश सुंदर सुवर्ण, श्रीमती विनोदा सुंदर सुवर्ण, श्रीमती शमिता सुंदर सुवर्ण	श्री. सुकेश सुंदर सुवर्ण, श्रीमती विनोदा सुंदर सुवर्ण, श्रीमती शमिता सुंदर सुवर्ण	पोटमाळा	13	निवासी
13	श्रीमती मुनिरा झुजर उदयपूरवाला	श्रीमती मुनिरा झुजर उदयपूरवाला	पहिला	14	निवासी
14	श्रीमती सोनल रसिक छेडा	श्रीमती सोनल रसिक छेडा	पहिला	15	निवासी
15	श्री. मुस्तफा फिरोझ छील	श्री. मुस्तफा फिरोझ छील	पहिला	16	निवासी
16	श्री. रत्नाकर शिवराम शेट्टी	श्री. रत्नाकर शिवराम शेट्टी	पहिला	17	निवासी
17	श्री. हुसैनी मोईज नवसरीवाला, श्रीमती बतुल हुसैनी नवसरीवाला	श्री. हुसैनी मोईज नवसरीवाला, श्रीमती बतुल हुसैनी नवसरीवाला	दुसरा	7	निवासी
18	श्री. कैमास जमशेद रोस्तमी, श्रीमती मेहेरनाझ कैमास रोस्तमी	श्री. कैमास जमशेद रोस्तमी, श्रीमती मेहेरनाझ कैमास रोस्तमी	दुसरा	8	निवासी
19	श्री. जमशेद शेरीयार राईशी, श्रीमती तनाझ जमशेद राईशी	श्री. जमशेद शेरीयार राईशी, श्रीमती तनाझ जमशेद राईशी	दुसरा	9	निवासी
20	श्रीमती नर्गिस कमरुद्दीन रावजी, श्री. सोहेल कमरुद्दीन रावजी	श्रीमती नर्गिस कमरुद्दीन रावजी, श्री. सोहेल कमरुद्दीन रावजी	दुसरा	18	निवासी
21	श्रीमती परवीन शाहबेहराम डेमेरी, श्रीमती गेटी शाहबेहराम डेमेरी	श्रीमती परवीन शाहबेहराम डेमेरी, श्रीमती गेटी शाहबेहराम डेमेरी	दुसरा	19	निवासी
22	श्री. खोजेमा अकबरली भिंडरवाला, श्रीमती रशीदा भिंडरवाला, श्रीमती झैनाब तारवाला	श्री. खोजेमा अकबरली भिंडरवाला, श्रीमती रशीदा भिंडरवाला, श्रीमती झैनाब तारवाला	दुसरा	20	निवासी
23	श्री. फक्रुद्दीन फिरोझ रंगवाला	श्री. फक्रुद्दीन फिरोझ रंगवाला	तिसरा	10	निवासी
24	श्रीमती फरीदा अब्बास पाटणवाला, श्री.अब्बास खानअली पाटणवाला	श्रीमती फरीदा अब्बास पाटणवाला, श्री.अब्बास खानअली पाटणवाला	तिसरा	11	निवासी
25	श्री. अब्बास ईस्माईल फतेही, श्रीमती शहनाझ अब्बास फतेही	श्री. अब्बास ईस्माईल फतेही, श्रीमती शहनाझ अब्बास फतेही	तिसरा	12	निवासी
26	श्रीमती बकुला केकीन छेडा	श्रीमती बकुला केकीन छेडा	तिसरा	21	निवासी
27	श्रीमती बकुला केकीन छेडा	श्रीमती बकुला केकीन छेडा	तिसरा	22	निवासी
28	श्री. कुरेश फुलाद डेमेहरी	श्री. कुरेश फुलाद डेमेहरी	तिसरा	23	निवासी

पुनर्विकास आणि / उपरोक्त यादीला जर कोणाची हरकत असेल तर, सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांत तसे खालील नमूद पत्त्यावर आम्हाला कळवावे.

पत्ता : प्रेम ईस्टेट, संत सावता क्रॉस रोड नं. १, संत सावता मार्ग, भायखळा, मुंबई - ४०० ०१०.
संपर्क : श्री. सुलेमान बुधवानी, दूरध्वनी क्र.: ०२२ - ६६०२ ८०००

कर्ज वसुली न्यायाधिकरण-I मुंबई

(भारत सरकार, वित्तीय मंत्रालय)
२रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४००००५
(५वा मजला, सिंथिया हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१)

ओ.ए. क्र. ५१८ सन २०२३

परि. १२

स्टेट बँक ऑफ इंडिया ...अर्जदार
विरुध्द
मे. कॅलिक्स लेनोरा रिअल टाय एलएलपी आणि इतर. ... प्रतिवादी
प्रति,

प्रतिवादी क्र. १	**मे. कॅलिक्स लेनोरा रिॲलिटी एलएलपी** ऑफिस क्र. ४०१, ४था मजला, सीटीएस क्र. १६२१/८०, सुप्रीम आयकॉन, बाणेर, सकल नगर जवळ, पुणे -४११००७ **येथे देखील:- कॅलिक्स हाऊस**, मिलेनियम स्टार, एक्सटेंशन बिल्डिंग, रुबी हॉल क्लिनिकच्या शेजारी, ढोले पाटील रोड, पुणे -४११००१.
प्रतिवादी क्र. ३	**मे. कॅलिक्स लेनोरा डेव्हलपर्स एलएलपी** **कॅलिक्स हाऊस**, मिलेनियम स्टार एक्सटेंशन बिल्डिंग, रुबी हॉल क्लिनिकच्या शेजारी, ढोले पाटील रोड, पुणे -४११००१.
प्रतिवादी क्र. ५	**श्री. गौरव सुनील सोमानी** प्लॉट क्र. २६, बालाजी सोसायटी, बिबवेवाडी, पुणे -४११०३७.

समन्स

१. **ज्याअर्थी,** वरील नमूद **ओए/५१८/२०२३** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर ०९/०८/२०२४ रोजी सूचीबद्ध केला होता.
२. **ज्याअर्थी,** नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. २२,३४,६७,६९७.६६** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली.
३. ज्याअर्थी, समन्स/नोटिसची बजवणी सामान्य पद्धतीने करता आली नाही आणि ज्याअर्थी, या न्यायाधिकरणाने पर्यायी सेवेसाठी अर्ज करण्यास परवानगी दिली आहे.
४. ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-
   (i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
   (ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
   (iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
   (iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
   (v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
५. तुम्हाला **१४/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व **रजिस्ट्रार**समोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: १७ ऑक्टोबर २०२३ रोजी दिले.

सही/-
आय/सी रजिस्ट्रार
कर्ज वसुली न्यायाधिकरण-१ मुंबई,